पुणे महानगरपालिका

*** स्थायी समिती ***

कार्यपत्रिका क्रमांक ४२

स्थायी समितीची साप्ताहिक सभा **मंगळवार दि. ८/१२/२००९** रोजी सकाळी ११:३० (साडे अकरा) वाजता **म.जोतिबा फुले सभागृहात** (स्थायी समिती सभागृहात) भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**वृत्तांत कायम करणे.**

**उत्पन्नाचा आढावा**

**विषय क्र. १०९९**

दि. २४/११/२००९ ते ३०/११/२००९ अखेर आयातकर कार्यालयाचा जमा उत्पन्नाचा, रहदारी व बिगरजकात पकडलेल्या वाहनांचा व दंडात्मक कार्यवाहीबाबत मा.आयातकर प्रमुख यांचे क्र. ३६६४ दि. २/१२/२००९ ने पाठविलेला तपशील माहितीसाठी.

**घनकचरा व्यवस्थापन आढावा**

**विषय क्रं. ११००**

पुणे महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाविषयी पाठविलेला साप्ताहिक अहवाल निदर्शनास आणणेबाबत मा.क्षेत्रिय अधिकारी, घन कचरा व्यवस्थापन यांचे क्र.एसडब्ल्युएमओ/१३८९ दि. २७/११/२००९ चे पत्र

**मा.सभासदांचे प्रस्ताव**

**विषय क्रं. ११०१**

मा.सौ.पार्वती भडके व मा.विरेंद्र किराड यांचे दि. २७/११/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. ४४ मध्ये स.नं. ४९(पार्ट) येथील नव्याने ताब्यात आलेल्या जागेत उद्यान विकसित करण्यात येणार आहे त्याठिकाणी सांस्कृतिक भवन बांधणेसाठी रु. २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-१० चे अंदाजपत्रक, १०.पथ. १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १३४, अ.क्र. २६, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरी करणे व तदनुषंगिक कामे करणे, (यादी एस-२), पान क्र २२८, अ.क्र. ९७, वॉर्ड क्र. ४४, स.नं. ५२/५३ भिमनगर ते बी.टी.कवडे रोडला नविन ताब्यात आलेला डी.पी. २४ मी. रस्ता तयार करणे | २५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम<br>वॉर्ड क्र. ४४ मध्ये स.नं. ४९(पार्ट) येथील नव्याने ताब्यात आलेल्या जागेत उद्यान विकसित करण्यात येणार आहे त्याठिकाणी सांस्कृतिक भवन बांधणे | --- | २५ लाख |

**विषय क्रं. ११०२**

मा.आबा बागुल,विरोधी पक्षनेता व मा.अरविंद शिंदे यांचे दि. ३०/११/२००९ चे पत्र.

गुरुनानक फौंडेशनच्या वतीने दरवर्षी टिळक महाविद्यालय प्रांगणात महाकिर्तन दरबार आयोजित केले जाते. या दरबारात (भजन) २५ ते ३० हजार शिख समाज व इतर समाजाचे लोकांचा समावेश असतो. हा कार्यक्रम तीन दिवस चालू असतो. सकाळ संध्याकाळी किर्तनाचे कार्यक्रम असतात. तसेच सकाळ संध्याकाळी कार्यक्रमातील सहभागी लोकांसाठी महाप्रसादाचे (लंगर) आयोजन केले जाते. सदर कार्यक्रमाचे यंदा सुवर्ण महोत्सवी (२५ वे) वर्ष आहे.

तरी सुवर्ण महोत्सवी किर्तन दरबार कार्यक्रमासाठी पुणे महानगरपालिकेच्या सहप्रायोजककरीता र.रुपये ११,००,०००/- (अक्षरी रुपये अकरा लाख फक्त) आर्थिक सहाय्य देण्यात यावे.

Unregistered

**विषय क्रं. ११०३**

मा.अरविंद शिंदे व मा.मोहनसिंग राजपाल यांचे दि. ३०/११/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. ४६ मध्ये पाण्याची लाईन टाकणे व भूमिगत विद्युत व्यवस्था करणेसाठी खालीलप्रमाणे र.रु. २० लाखाचे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| पान क्र. २५९, यादी क्र. एस ४ नं.६, एफई१४अे१०१/एस४-७६, वॉर्ड क्र. ४६ खड्डा चाळ येथे विविध विकासाची कामे करणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र. ४६ मध्ये पाण्याची लाईन टाकणे | --- | ३ लाख |
| २) वॉर्ड क्र. ४६ मध्ये भूमिगत विद्युत व्यवस्था करणे | --- | १७ लाख |

**विषय क्रं. ११०४**

मा.सौ.मेधा बाबर व मा.तानाजी लोणकर यांचे दि. ३०/११/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. १२२ मध्ये मिठानगर परिसरातील विविध ठिकाणचे रस्ते डांबरीकरण करणेसाठी र.रु. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यात यावे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-२०१० चे अंदाजपत्रक , ५.लोकारोग्य, पान क्र. १२८, अ.क्र. ८१, शहरात स्मशान भुमिमध्ये विकासाची कामे करणे. (यादी क्र.एस-२४), पान क्र. २४७, अ.क्र. १७, वॉर्ड क्र. १२२ स.नं. ४७ साईबाबा नगर मध्ये मुस्लिम कब्रस्तानसाठी विकास कामे करणे | २० लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १२२ मध्ये मिठानगर परिसरातील विविध ठिकाणचे रस्ते डांबरीकरण करणे | --- | २० लाख |

**विषय क्रं. ११०५**

मा.सचिन भगत यांचे दि. ३०/११/२००९ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीच्या बाहेर भूसंपादनाने जागा किमान ५ ते १० एकर जागा ताब्यात घेऊन शहरातील मोकाट जनावरांसाठी एक संगोपन केंद्र उभारण्यात यावे.

**विषय क्रं. ११०६**

मा.वसंत मोरे, मा.बाबु वागसकर व मा.रविंद्र धंगेकर यांचे दि. २/१२/२००९ चे पत्र.

कात्रज गावठाणाच्या बाजूला कोंढवा रोडलगत नविन वसाहत या नावाने ६४२ घरांची एक वसाहत आहे. सदर जागा ही महानगरपालिकेच्या मालकीची आहे. याठिकाणी राहणारे लोक गेली २५ वर्षापासून या ठिकाणी रहावयास आहेत व सदर ठिकाणी राहणारे नागरिक हे सर्वसामान्य गरीब कुटूंबातील आहेत. आत्तापर्यंत सहकारनगर क्षेत्रिय कार्यालयाच्या वतीने २५१ व धनकवडी क्षेत्रिय कार्यालयाच्या वतीने ५६ असे याठिकाणी एकूण ३०७ लोकांना अधिकृतरित्या झोपडीधारक म्हणून फोटोपास वाटण्यात आले आहेत तसेच आत्तापर्यंत या ठिकाणच्या नागरिकांकडून पुणे मनपा फक्त सेवाशुल्क आकारत होती व तशा प्रकारची बिलेही त्यांच्याकडून स्विकारली जात होती व सेवाशुल्कापोटी सहकारनगर क्षेत्रिय कार्यालयाकडून रुपये ६,६१,२७०/- व धनकवडी क्षेत्रिय कार्यालयाकडून रुपये २,५१,८९७/- एवढी रक्कम आकारण्यात आलेली आहे. परंतू यावेळी नागरिकांना मनपाकडून पुर्णपणे टॅक्स येवून २० ते २५ हजार रुपयांची थकित बिले देण्यात आलेली आहेत व ही पूर्णपणे प्रशासनाची चूक आहे तसेच पूर्वी आकारण्यात येत असल्याप्रमाणेच सेवाशुल्काची बिले आता आकारण्यात यावी आणि जोपर्यंत मनपाकडून ही चूक सुधारण्यात येत नाही तोपर्यंत बिल वसूली करण्यास स्थगिती देण्यात यावी.

## माहितीसाठी आलेले विषय

**विषय क्रं. ११०७**

दि. १६/११/२००९ ते दि. २२/११/२००९ अखेर संपणाऱ्या आठवड्यात पुणे म.न.पा.च्या हद्दीत लागलेल्या एकुण १८ आगींबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पत्र क्र. मआ/अशाद/५९४ दि. १/१२/२००९ ने पाठविलेला अहवाल माहितीसाठी.

Unregistered

**विषय क्र. ११०८**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २५/४/२००९ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २१/८/२००९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/५४२ दि. २/१२/२००९ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये २,१५,७७,३३८/- चा तक्ता माहितीसाठी.

**विषय क्र. ११०९**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये दि. २/५/२००९ अखेर संपलेल्या आठवडयाचा तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०६(१) (अ) अनुसरुन दि. २९/८/२००९ अखेर संपणाऱ्या आठवडयाचा मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्रं. मुलेप/५४३ दि. २/१२/२००९ ने पाठविलेला अहवाल तसेच या आठवड्यात मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी त्यांच्या पत्रात नमूद केलेल्या विविध खात्याकडील आढळून आलेली वसूलपात्र रक्कम रुपये १०,०१,५४,२७४/- चा तक्ता माहितीसाठी.

## हिशोब तपासणी अहवाल

**विषय क्रं. १११०**

विकास योजना खात्याकडील सन १९९२-१९९३ ते १९९९-२००० मधील जमिन विकास शुल्क तसेच तदनुषंगिक जमा फी च्या आकारणीचे तपासणी केली असता आढळून आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/४११ दि. २४/२/२००३ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ३३ सन २००२-२००३ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/मुले/५९६ दि. १/१२/२००९ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता-ब.

**विषय क्रं. ११११**

मा.नगर अभियंता, विकास योजना खात्याकडील सन १९९२-९३ ते २००३-०४ मधील जमीन विकास शुल्क तसेच तदनुषंगिक जमा फी च्या आकारणीची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/६१३ दि. १४/१/२००५ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ५० सन २००४-०५ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/मुले/५९७ दि. १/१२/२००९ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता-ब.

**विषय क्रं. १११२**

विकास योजना विभागाच्या सन २००८-०९ मधील ले-आऊट प्रकरणांची तपासणी केली असता आढळून आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी जा.क्रं मुलेप/८०५ दि. २४/२/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ८१ सन २००८-२००९ ला अनुसरून मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/मुले/५९८ दि. १/१२/२००९ ने पाठविलेला आक्षेप पुर्ततेचा संकलित तक्ता-ब.

**विषय क्रं. १११३**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील माहे जून २००८ मधील विविध पेठांच्या आकारणी प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/५४४ दि. २/१२/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ५७ सन २००९-१० विचारासाठी.

**विषय क्रं. १११४**

कर आकारणी व कर संकलन खात्याकडील माहे मे २००८ मधील विविध पेठांच्या आकारणी प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/५४५ दि. २/१२/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ५८ सन २००९-१० विचारासाठी.

Unregistered

**विषय क्रं. १११५**

कर आकारणी व कर संकलन विभागाच्या धनकवडी क्षेत्रिय कार्यालयाकडील आंबेगाव बुद्रुक मधील वॉर्ड क्र. ३, ४, ५ च्या ८अ वरुन सन १९९९-२००० मधील आकारणी प्रकरणांची तपासणी केली असता आढळुन आलेल्या आक्षेपार्ह व दोषास्पद बाबींबाबत मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी क्र. मुलेप/५४६ दि. २/१२/२००९ ने पाठविलेला हिशोब तपासणी अहवाल क्रं. ५९ सन २००९-१० विचारासाठी.

**सेवकवर्गाची प्रकरणे**

**विषय क्रं. १११६**

श्री.सचिन विठ्ठल खेडेकर, ज्यु.ग्रेड लेखनिक, प्रत्यक्ष कामास टिळकरोड क्षेत्रिय कार्यालय व वेतनास बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय यांचे निलंबनास दि. ३१/१/२००९ रोजी दुसरी सहामाही पूर्ण झाल्याची बाब निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/विका ४/५८२ दि. ३०/११/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. १११७**

अग्निशमन दलाकडील सर्व सेवकांना दि. ५/१२/२००९ ते ४/१२/२०१० या कालावधीकरिता अपघाती विमा योजना लागू करणेसाठी वार्षिक विमा हप्ता भरणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/अशाद/५८९ दि. ३०/११/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. १११८**

अतिक्रमण विभागाकडील रोजंदारी बिगारी उमेदवारांना मुदतवाढ देणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सेवि/५९० दि. ३०/११/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. १११९**

पुणे महानगरपालिकेकडील श्री.लक्ष्मण रामभाऊ डामसे, उप आयुक्त(गवनि), श्री.प्रदिप भालचंद्र नाईक, सहाय्यक अभियंता, श्री.अजय दत्तात्रय वायसे, कनिष्ठ अभियंता यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंध विभागाकडून करण्यात आलेल्या तपासांती अभियोग दाखल करण्यास मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(सेवि)/५९१ दि. १/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११२०**

श्रीमती संध्या दुला गागरे, हुद्दा क्षेत्रिय अधिकारी, संगमवाडी क्षेत्रिय कार्यालय यांचे निलंबनास दि. १९/४/२००८ रोजी चौथी, दि. १९/१०/२००८ रोजी पाचवी व दि. १९/४/२००९ रोजी सहावी सहामाही पूर्ण झाली असल्याने सदरची बाब मनपा सेवा विनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सेवि/५९९ दि. १/१२/२००९ चे पत्र.

UnRegistered

**विषय क्रं. ११२१**

श्री.दिपक भालचंद्र कुलकर्णी, सहाय्यक अभियंता, भूमिप्रापण कार्यालय यांचे निलंबनास दि. २७/५/२००९ रोजी सातवी सहामाही पूर्ण झाली असल्याने सदरची बाब मनपा सेवानियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सेवि/६०० दि. १/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११२२**

श्री.भोसले रविंद्र बबन, शिपाई, येरवडा क्षेत्रिय कार्यालय प्रत्यक्ष कामास संगमवाडी क्षेत्रिय यांचे निलंबन कालावधी दि. २५/११/२००६, दि. २५/५/२००७, दि. २५/११/२००७, दि. २५/५/२००८, व दि. २५/११/२००८ रोजी अनुक्रमे सातवी (७ वी), आठवी (८ वी), नववी (९ वी), दहावी (१) वी) व अकरावी (११ वी), दि. २५/५/२००९ (१२ वी) सहामाही पूर्ण झाली असल्याने सदरची बाब मनपा सेवा विनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सेवि/६०६ दि. ३/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११२३**

विकास अभियंता, विकास योजना या कार्यालयाकडील श्री.मोहन दगडू मारणे (आरेखक) यांच्या निलंबन काळाची दि. ३१/७/२००९ रोजी पूर्ण झालेली तिसरी सहामाही सेवानियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/सेवि/६०७ दि. ३/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११२४**

श्री.हरिदास भानुदास वाघमारे, बिगारी, औंध क्षेत्रिय कार्यालय यांच्या निलंबन काळाची दि. ११/८/२००९ रोजी पूर्ण झालेली नववी सहामाही सेवाविनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/सेवि/६०९ दि. ३/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११२५**

श्रीमती वैजयंता सुधीर बारंगुळे, बिगारी, येरवडा क्षेत्रिय कार्यालय यांच्या निलंबन कालावधी दि. २/९/२००७ (पहिली), दि. २/३/२००८ (दुसरी), दि. २/९/२००८ (तिसरी), दि. २/३/२००९ (चौथी) सहामाही पूर्ण झाली असल्याने सदरची बाब मनपा सेवा विनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/सेवि/६१० दि. ३/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११२६**

श्री.विनोद मधुकर अवचर, हुद्दा–झाडुवाला, कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालय यांच्या निलंबन काळाची दि. २६/८/२००९ रोजी पूर्ण झालेली दुसरी सहामाही मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/सेवि/६१३ दि. ३/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११२७**

श्री.नितीन ईश्वर गोडाले, मेहतर, औंध क्षेत्रिय कार्यालय यांच्या निलंबन काळाची दि. १२/११/२००९ रोजी पूर्ण झालेली पहिली सहामाही सेवाविनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/सेवि/६१४ दि. ३/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११२८**

श्री.संतोष माणिक गवळी, हुद्दा–कचरा मोटार बिगारी, सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय यांच्या निलंबन काळास दि. २/८/२००९ रोजी पूर्ण झालेली पाचवी सहामाही मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/सेवि/६१५ दि. ३/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११२९**

श्री.रणजित बळीराम मोहिते, बिगारी, औंध क्षेत्रिय कार्यालय यांच्या निलंबन काळाची दि. २७/७/२००९ रोजी पूर्ण झालेली सातवी सहामाही मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/सेवि/६१७ दि. ३/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११३०**

श्री.महादेव दिगंबर खंडाळे, हुद्दा–कचरा मोटार बिगारी, सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय यांच्या निलंबन काळास दि. २/८/२००९ रोजी पूर्ण झालेली पाचवी सहामाही मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/सेवि/६१८ दि. ३/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११३१**

श्री.शंकर बापू थोरात, सि.ग्रेड लेखनिक, पं.नेहरु स्टेडियम प्रत्यक्ष कामास नक्कल विभाग यांच्या निलंबन कालावधीस दि. २/७/२००९ रोजी पूर्ण झालेली चौथी सहामाही मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/सेवि/६१९ दि. ३/१२/२००९ चे पत्र.

Unregistered

**विषय क्रं. ११३२**

श्री.संजय बबन कामठे, ज्यु.ग्रेड लेखनिक प्रत्यक्ष कामास औंध क्षेत्रिय कार्यालय व वेतनास बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय यांच्या निलंबन कालावधीस दि. ३/१२/२००९ रोजी नववी व दि. ३/६/२००९ रोजी दहावी सहामाही पूर्ण झालेली असून सदरची बाब मनपा सेवाविनियम क्र. ५८ नुसार निदर्शनास आणणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/सेवि/६२० दि. ३/१२/२००९ चे पत्र.

**ठरावान्वये आलेले अभिप्राय**

**विषय क्रं. ११३३**

वॉर्ड क्र. १ मध्ये विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याची लाईन टाकणे या कामासाठी वर्गीकरण करणेबाबत मा.सौ.रेखा टिंगरे यांचे दि. १६/७/२००९ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्र. ४११ दि. २८/७/२००९ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र.मआ/विका क्र.२/५९२ दि. १/१२/२००९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**सर्वात कमी रक्कमेचे टेंडर्स**

**विषय क्रं. ११३४**

कोंढवा खुर्दगाव ते शिवनेरीनगरकडे जाणारा डी.पी.रस्ता विकसन करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.शारदा कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २९,९७,७१५/- पेक्षा १५.०३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २५,४७,१५८=४४ पर्यंत काम करुन घेणेस तसेच सिमेंट, स्टील व डांबर यांचे बाजारभावानुसार फरक अदा करणेस/कपात करणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/विअ(पथ)/५७८ दि. २७/११/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११३५**

वडगांव शेरी सुंदराबाई मराठी शाळा ते साईनाथनगरपर्यंत १८ मी.डी.पी.रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी ठेकेदार मे.दिपक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७४,९९,९८४=३० पेक्षा ३३.३३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ५०,००,२३९=५३ पर्यंत काम करुन घेणेस तसेच डांबर, सिमेंट, स्टील यांचे बाजारभावानुसार फरक अदा करणेस/कपात करणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/पथ/५८० दि. ३०/११/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११३६**

जे.एन.एन.यु.आर.एम.अंतर्गत मौजे कात्रज स.नं. १४६ येथील तलावाचे कात्रज गावाकडील बाजूस नागरिकांसाठी घाट बांधणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या १३ टेंडसपैकी ठेकेदार मे.स्वामीराज इंटरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,३१,९४२/- पेक्षा २१.२२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १५,२१,९८३=९१ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उद्यान/५८१ दि. ३०/११/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११३७**

वॉर्ड क्र. ६० हॉटेल किनारा ते कांचनबन सोसायटी रस्त्याचे डांबरीकरण करणे व पावसाळी लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडसपैकी ठेकेदार मे.मोहनलाल मथरानी कन्स्ट्रक्शन प्रा.लि. यांचे टेंडर दोघात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २३,४९,९९०/- पेक्षा ९.१८% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २१,३४,२६०=९२ पर्यंत काम करुन घेणेस तसेच टेंडर कालावधीत डांबर/सिमेंट व स्टील यांचे दरात होणारी वाढ/घट त्यानुसार ठेकेदारास अदा/वसूल करणे यास अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/पथ/५८३ दि. ३०/११/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११३८**

वडगांव मुख्य रस्ता डांबरी करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.अश्विन कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३७,४९,९५८=७८ पेक्षा ३% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३६,३७,४६०=०२ पर्यंत काम करुन घेणेस तसेच डांबर, सिमेंट, स्टील यांचे बाजारभावानुसार फरक अदा करणेस/कपात करणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/पथ/५८४ दि. ३०/११/२००९ चे पत्र.

UnRegistered

**विषय क्रं. ११३९**

वॉर्ड क्र. १०७ नाईक पूल ते अलंकार ४० फूट डी.पी.रोड करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडसपैकी ठेकेदार मे.दिपक कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ४९,८२,८७०/– पेक्षा २६.६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये ३६,५७,४२६=५८ पर्यंत काम करुन घेणेस तसेच टेंडर कालावधीत डांबर/सिमेंट व स्टील यांचे दरात होणारी वाढ/घट त्यानुसार ठेकेदारास अदा/वसूल करणे यास अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/पथ/५८५ दि. ३०/११/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११४०**

वॉर्ड क्र. १०७ नाईक पूल ते गुलाबराव ताटे पथ दरम्यान कॅनॉल रस्ता ग्राऊट करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडसपैकी ठेकेदार मे.सारीका अर्थमुव्हर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,८३,२४०/– पेक्षा ३२.३१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १३,४२,४५५=१६ पर्यंत काम करुन घेणेस तसेच टेंडर कालावधीत डांबर/सिमेंट व स्टील यांचे दरात होणारी वाढ/घट त्यानुसार ठेकेदारास अदा/वसूल करणे यास अधिन राहून त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/पथ/५८७ दि. ३०/११/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११४१**

वॉर्ड क्र. ९५ काळेबोराटेनगर येथे गणपती मंदिर ते श्री.नाटे बंगला, माऊली कॉलनी ते महादेव मंदिर, श्री.न्हावले रस्ता व निर्मल टाऊनशिप ते सत्याराज सिटीपर्यंत पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार श्री.श्रीधर एस.काकडे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. २८,६७,७९४/– पेक्षा ०२.१% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २८,०७,५७०=३३ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/विअ(पापु)/५९५ दि. १/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११४२**

कॅटॅगिरी २, पॅकेज ८ विमानतळ ते डेक्कन कॉलेज व्हाया हॉट मिक्स प्लान्ट या रस्त्यांचे डांबरीकरण व तदनुषंगिक कामे करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडसपैकी ठेकेदार मे.कृष्णाई कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ३१,३६,५२,७८४/– पेक्षा १२.९६% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये २७,३०,०३,३८३=१९ तसेच डांबर, स्टील सिमेंटसाठी बाजारभावानुसार फरक अधिक उर्वरित माल मटेरियलसाठी भाववाढ सुत्रानुसार येणाऱ्या रकमेपर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/जनेराशपुअ/५९३ दि. १/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११४३**

पुणे मनपाच्या विद्युत विभागासाठी १५० वॅट एच.पी.एस.व्ही.स्ट्रीट लाईट फिटींग पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी टेंडरदार मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रातील टेंडर स्पेसिफिकेशनप्रमाणे १५० वॅट एच.पी.एस.व्ही.स्ट्रीट लाईट फिटींग प्रती नगास रुपये २,५१०/– याप्रमाणे १००० नगासाठी एकूण र.रुपये २५,१०,०००/– (सर्व करांसह) खरेदी करणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उआ(तांत्रिक)/६११ दि. ३/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११४४**

पुणे मनपाच्या विद्युत विभागासाठी २५० वॅट एच.पी.एस.व्ही.स्ट्रीट लाईट फिटींग पुरविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ५ टेंडसपैकी टेंडरदार मे.क्रॉम्प्टन ग्रीव्हज लि. यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे असल्याने त्यांचेकडून मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे विषयपत्रातील टेंडर स्पेसिफिकेशनप्रमाणे २५० वॅट एच.पी.एस.व्ही.स्ट्रीट लाईट फिटींग प्रती नगास रुपये २,७९७/– याप्रमाणे १००० नगासाठी एकूण र.रुपये २७,९७,०००/– (सर्व करांसह) खरेदी करणेसाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उआ(तांत्रिक)/६१२ दि. ३/१२/२००९ चे पत्र.

Unregistered

## संकिर्ण

**विषय क्रं. ११४५**

केंद्र शासनाच्या शहरी विकास मंत्रालय मार्फत दिल्ली येथे दि. ३ ते ५ डिसेंबर २००९ दरम्यान भरविण्यात येणाऱ्या वार्षिक परिषद व प्रदर्शन मध्ये पुणे महानगरपालिकेला सहभागी होण्यासाठी व त्याअनुषंगाने प्रमुख प्रायोजकत्वासाठी (लिड स्पॉन्सर) येणाऱ्या खर्चास अंदाजे र.रुपये ५ लाखाला मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/जनेराशपुअ/५७९ दि. ३०/११/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११४६**

पुणे महानगरपालिका अंतर्गत संगम पूल ते बंडगार्डन बंधारा यामध्ये साठवलेल्या गाळाचे महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड (महाराष्ट्र शासनाचा उपक्रम) यांचेकडून सर्वेक्षण करुन घेण्यास व त्यास लागणारा आगाऊ मोजणी फी र.रुपये प्रति दिनी ३०,०००/- प्रमाणे रुपये २६,४७,२००/- पर्यंत काम करुन घेण्यास व त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/जनेराशपुअ/५८६ दि. ३०/११/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११४७**

अंदाजपत्रकातील मान्य तरतुदीमधुन रक्कम रुपये ३ कोटीचे वर्गीकरण पथ १) सन २००९-१० भांडवली खर्चाचे अंदाजपत्रक, १०.अ.पूल व नदी सुधारणा, (विकास योजना), अ.क्र. २८, पान क्र. १५८, शहरात विविध ठिकाणी पूल बांधणे, भुयारी मार्ग करणे, (यादी एस-४०), किनारा हॉटेल पौड रोड येथे सब वे करणे, अ.क्र. २३, पान क्र. २४५, बजेट कोड सीई२०डी१७०/एस४०-२३ र.रुपये १.८० कोटी २) सन २००९-१० भांडवली खर्चाचे अंदाजपत्रक, १०.अ.पूल व नदी सुधारणा, (विकास योजना), अ.क्र. २८, पान क्र. १५८, शहरात विविध ठिकाणी पूल बांधणे, भुयारी मार्ग करणे, (यादी एस-४०), मोहनराव शिराळकर चौक येथे भुयारी मार्ग बांधणे, अ.क्र. २५, पान क्र. २४५, बजेट कोड सीई२०डी१७०/एस४०-२५ र.रुपये १.२० कोटी या खात्यातून ज.ने.रा.श.पु.अ., सन २००९-१० भांडवली खर्चाचे अंदाजपत्रक, १०.क.पथ सुधारणा, अ.क्र. २६४, पान क्र. १४६, पौड रस्ता व कर्वे रस्ता येथे पादचारी पूल बांधणे (वि.का.तां.सं.) बजेट कोड सीई२०अे१२२७ १) पौड रोड - मोरे विद्यालय चौक येथे पादचारी भुयारी मार्ग करणे २) पौड रोड - राजा शिवराय प्रतिष्ठान चौक येथे पादचारी भुयारी मार्ग करणे या खात्याकडे वर्ग करणेस मा.स्थायी समितीमार्फत मा.मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे क्रं. मआ/जनेराशपुअ/६१६ दि. ३/१२/२००९ चे पत्र.

UnRegistered

**विषय क्रं. ११४८**

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील विविध दवाखाने व रुग्णालयांसाठी अत्यावश्यक औषधे खरेदी करण्यासाठी निविदा मागविल्या असता आलेल्या १० पात्र निविदाधारकांकडून (एकूण ७५ औषध कंपन्यांपैकी) सर्वात कमी दर देणाऱ्या औषधांची र.रुपये ६ कोटीपर्यंत वेळोवेळी आवश्यकता भासेल त्याप्रमाणे औषधे खरेदी करणे प्रित्यर्थ त्यांचेशी करार करणेस व त्यांना बिल अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/आरोग्य/६२१ दि. ३/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११४९**

वॉर्ड क्र. ८६ विविध ठिकाणी पाण्याची लाईन टाकणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडसपैकी ठेकेदार मे.नबिलाल कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. १९,९९,७७६/- पेक्षा ११.९९% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रुपये १७,६०,००२=८६ पर्यंत काम करुन घेण्यासाठी त्यांचेबरोबर करार करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/पापु/६२२ दि. ३/१२/२००९ चे पत्र.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

**(टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. १०/१२/२००९

**विषय क्रं. ११५०**

मा.श्रीमती लता राजगुरु व मा.सौ.मंगला मंत्री यांचे दि. ३/१२/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. ३७ मधील डॉ.नायडू हॉस्पिटल शेजारील नव्याने बांधण्यात आलेले समाजमंदिर भाग्यवती दलितोध्दार महिला समाजोन्नती संस्थेस ११ वर्षे मुदतीसाठी करार करुन चालविण्यास देण्यास मान्यता द्यावी

**विषय क्रं. ११५१**

मा.श्रीमती लता राजगुरु व मा.सौ.मंगला मंत्री यांचे दि. ३/१२/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. ३७ मध्ये ख्रिश्चन समाजाकरिता करण्यात आलेल्या दफनभूमीची देखभाल करण्याकरिता सदरची दफनभूमी भारतीय ख्रिश्चन दफनभूमी, ताडीवाला रोड समिती, पुणे या संस्थेस देण्यास मान्यता द्यावी

**विषय क्रं. ११५२**

मा.चंद्रकांत मोकाटे, आमदार यांचे दि. ४/१२/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. १०५ मध्ये नवसह्याद्री परिसरात पावसाळी लाईन टाकणेसाठी र.रु. १५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-२०१० चे अंदाजपत्रक, क.अंदाजपत्रक, २.गटारे व नाले, पान क्र. २८, अ.क्र. ६, पावसाळी गटारे करणे, (यादी क्र.एस-७), पान क्र.५१, अ.क्र.३९, वॉर्ड क्र. १०६ कृतिका सोसायटी ते तेजसनगर मैदान पावसाळी लाईन टाकणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. १०५ मध्ये नवसह्याद्री परिसरात पावसाळी लाईन टाकणे | --- | १५ लाख |

**विषय क्रं. ११५३**

मा.चंद्रकांत मोकाटे, आमदार यांचे दि. ४/१२/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. ६० मध्ये परमहंसनगर, लोकमान्य वसाहतजवळ ड्रेनेज लाईन टाकणे तसेच वॉर्ड क्र. ५८ मध्ये शितल सोसायटी परिसरात ४ इंची पाण्याची लाईन टाकणे या कामासाठी र.रुपये १५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-२०१० चे अंदाजपत्रक, क.अंदाजपत्रक, २.गटारे व नाले, पान क्र. २८, अ.क्र.६, पावसाळी गटारे करणे, (यादी क्र.एस-७), पान क्र.५१, अ.क्र.४३, वॉर्ड क्र. १०६ हिमगौरी सोसायटी ते तेजलकुंज सोसायटी परिसरात पावसाळी लाईन टाकणे | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| १) वॉर्ड क्र. ६० मध्ये परमहंसनगर, लोकमान्य वसाहतजवळ ड्रेनेज लाईन टाकणे | --- | १० लाख |
| २) वॉर्ड क्र. ५८ मध्ये शितल सोसायटी परिसरात ४ इंची पाण्याची लाईन टाकणे | --- | ५ लाख |

**विषय क्रं. ११५४**

मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता व मा.सुनिल बिबवे यांचे दि. ४/१२/२००९ चे पत्र.

राष्ट्रीय नेमबाज खेळाडू परिमल तुषार देशमुख यांना वर्ल्ड युनिव्हरसिटी चॅम्पियनशिप या चीनमध्ये होणाऱ्या नेमबाजी स्पर्धेचा सराव करण्यासाठी १० मी.एरर पिस्टल विकत घेणेकरिता र.रुपये १ लाख अनुदान देण्यास मान्यता द्यावी.

**विषय क्रं. ११५५**

मा.अशोक येनपुरे व मा.सुनिल बिबवे यांचे दि. ४/१२/२००९ चे पत्र.

कु.राहुल हनुमंत काळे, रा.कर्वेनगर, पुणे ५२ या क्रिकेटपटूची ग्रामीण भारतीय क्रिकेट संघात बांगलादेश दौऱ्यासाठी निवड झाली आहे. सदर स्पर्धेच्या खर्चासाठी र.रुपये ६० हजारांची आर्थिक मदत देण्यास मान्यता द्यावी.

Unregistered

**विषय क्रं. ११५६**

मा.दिपक गावडे यांचे दि. ४/१२/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. ११४ जनता वसाहत विविध ठिकाणी जुनी ड्रेनेज लाईन बदलणे, कॉंक्रीट करणे व तदनुषंगिक कामे करणेसाठी र.रु. १० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, अंदाजपत्रक अ व क मधील क्षेत्रिय कार्यालयाने नागरिकांच्या सहभाग योजनेतून करावयाची कामे, टिळक रोड क्षेत्रिय कार्यालय, सीटीझेडएन९ ३७/४९, एफई१४अे१२१/सी५–४९५, वॉर्ड क्र. ११४ जनता वसाहत मधील डोंगरावरची वाघजाई परिसरातील उर्वरित ड्रेनेज कॉंक्रीट करणे | ५ लाख | --- |
| एफई१४अे१२१/सी५–४९६, वॉर्ड क्र. ११४ जनता वसाहत मधील राममंदिर डोंगरावरील परिसरातील उर्वरित ड्रेनेज कॉंक्रीट करणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| वॉर्ड क्र. ११४ जनता वसाहत विविध ठिकाणी जुनी ड्रेनेज लाईन बदलणे, कॉंक्रीट करणे व तदनुषंगिक कामे करणे | --- | १० लाख |

**विषय क्रं. ११५७**

मा.अविनाश बागवे व मा.लक्ष्मण आरडे यांचे दि. ७/१२/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. ८८ याठिकाणी खालील कामे करणेसाठी र.रु. ५ लाखाचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–१० चे अंदाजपत्रक, अंदाजपत्रक अ व क मधील क्षेत्रिय कार्यालयाने नागरिकांच्या सहभाग योजनेतून करावयाची कामे, भवानी पेठ क्षेत्रिय कार्यालय, सीटीझेडएन९, सीई २०अे/१९६/सीझेड/७५२, पान क्र. ३२/४९ वॉर्ड क्र. ८८ क्रांतीवीर लहूजी वस्ताद साळवे बालवाडी ते म्हसोबा मंदिरपर्यंत डांबरीकरण करणे | ५ लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १)वॉर्ड क्र.८८ काशेवाडी चमनशहा दर्गाजवळ जळीतग्रस्त झोपड्यांना अनुदान देणे | --- | ३.३५ लाख |
| २) वॉर्ड क्र. ८८, ५५३ काशीवाडी कराळे बालवाडी समोर शहाबादी फरशी बसविणे, ड्रेनेज लाईन टाकणे व कॉंक्रीट करणे | --- | १.६५ लाख |

**विषय क्रं. ११५८**

मा.दिलीप उंबरकर व मा.सागर माळकर यांचे दि. ८/१२/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. ५९ मध्ये विविध ठिकाणी पाण्याच्या लाईन टाकणे व समाजमंदिर बांधणेसाठी र.रु. १५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९–२०१० चे अंदाजपत्रक,२.प्राथमिक शिक्षण,पान क्र.१२०, अ.क्र. १३३, शहरात विविध ठिकाणी प्राथमिक शाळांमध्ये विकासाची कामे करणे,(यादी क्र. एस–२३), पान क्र.२४६, अ.क्र.७, वॉर्ड क्र.५९ किष्किंधानगर मध्ये मनपा शाळा बांधणे. | १५ लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १) वॉर्ड क्र. ५९ मध्ये विविध ठिकाणी पाण्याच्या लाईन टाकणे | --- | १० लाख |
| २) वॉर्ड क्र. ५९ मध्ये समाजमंदिर बांधणे | --- | ५लाख |

**विषय क्रं. ११५९**

मा.सुनिल कांबळे व मा.उज्ज्वल केसकर यांचे दि. ८/१२/२००९ चे पत्र.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे यांच्यातर्फे दि. १२ ते २० जानेवारी २०१० पर्यंत जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या असून सदर स्पर्धेकरिता पुणे महानगरपालिकेने सहप्रायोजकत्व स्विकारुन र.रु. ३ लाखपर्यंत खालीलप्रमाणे वर्गीकरणाने खर्च करण्यास मान्यता द्यावी.

Unregistered

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-१० चे अंदाजपत्रक, १०.पथ, १०.क.पथ सुधारणा, पान क्र. १३४, अ.क्र. २६, शहरात निरनिराळ्या ठिकाणी रस्ते डांबरी करणे व तदनुषंगिक कामे करणे, (यादी एस-२), पान क्र. २३२, अ.क्र. २७४, वॉर्ड क्र. ११८ आंबेडकरनगर झोपडपट्टीतील रस्ते डांबरीकरण करणे (उपलब्ध तरतूद रुपये १० लाख) | ३ लाख | --- |
| नविन सुचविलेले काम | | |
| श्री स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ, पुणे यांच्यातर्फे दि. १२ ते २० जानेवारी २०१० पर्यंत जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आल्या असून सदर स्पर्धेकरिता पुणे महानगरपालिकेने सहप्रायोजकत्व स्विकारणे | --- | ३ लाख |

**विषय क्रं. ११६०**

मा.सौ.रत्नप्रभा जगताप व मा.अविनाश जाधव यांचे दि. ८/१२/२००९ चे पत्र.

वॉर्ड क्र. ९७ (महादजी शिंदे छत्री) मध्ये विविध ठिकाणी रस्ते डांबरीकरण करणे व इंटरलॉकींग ब्लॉक बसविणेकामी र.रु. २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००९-२०१० चे अंदाजपत्रक, १६ उद्याने प्राणी संग्रहालय,पान क्र.१७६, अ.क्र.१०१ डेक्कन कॉलेज परिसरात हेरीटेज पार्क विकसित करणे. (एकुण तरतुद ७५ लाख) | २५ लाख | --- |
| नविन सुचविलेली कामे | | |
| १) वॉर्ड क्र. ९७, स.नं. ५५ शांतीनगरमागील रस्ता डांबरीकरण करणे | --- | १० लाख |
| २) वॉर्ड क्र. ९७, स.नं. ५८/२ कांबळे गल्लीमध्ये रस्ता डांबरीकरण करणे | --- | ५लाख |
| ३) वॉर्ड क्र. ९७, सनग्रेस स्कूल रस्ता डांबरीकरण करणे | --- | ६ लाख |
| ४) वॉर्ड क्र. ९७ स.नं. ६२/७ खांबेवस्ती गल्लीमध्ये इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे | --- | ४ लाख |

**विषय क्रं. ११६१**

मा.अनिल भोसले, सभागृह नेता व मा.विरेंद्र किराड यांचे दि. ८/१२/२००९ चे पत्र.

सदाशिव पेठ सि.स.क्र. ४५८/३ अंदाजे ५०० चौ.मी. येथील पार्किंग आरक्षण क्र. एमपी-१४ येथे अस्तित्वातील रहाती घरे असून तसेच उर्वरित आरक्षणावरही घरे आहेत. तरी येथील आरक्षणाचा भूसंपादनाचा प्रस्ताव रद्द करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रं. ११६२**

मा.विजय देशमुख व मा.विरेंद्र किराड यांचे दि. ८/१२/२००९ चे पत्र.

हडपसर स.नं. ४२अे/आयजी, ४२अे/आयएच, ४२अे/आय आय, ४२अे/आयजी, आय/आय४२अे/आयजे/आय ४२अे/आयजे, ४२अे/आयई+६अे हे एकूण क्षेत्र ५१०३-४० पुणे मनपाच्या ताब्यात ॲमिनेटी स्पेस म्हणून आलेली आहे.

तरी सदर जागेवर पुणे सासवड रोड रुंदीकरणाअंतर्गत जाणाऱ्या दुकानदारांना पर्यायी जागा म्हणून व्यवसायासाठी देण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रं. ११६३**

मा.शाम देशपांडे व मा.अशोक येनपुरे यांचे दि. ८/१२/२००९ चे पत्र.

स्थायी समिती ठराव क्र. ७१ दि. २८/४/२००९ चा फेरविचार करण्यात यावा. (पुणे कोथरुड स.नं. ३० पार्ट याठिकाणी दगडी खाण असून या खाणीमुळे अनारोग्य परिस्थिती झाल्याने सदर दगडी खाणीतील व पोहोच रस्त्याची जागा क्रिडा संकूल व ऑडिटोरिअम इ.कारणांसाठी भूसंपादन कायद्यान्वये किंवा तडजोडीने पुरेशी आर्थिक तरतुद उपलब्ध करुन पुणे मनपाच्या ताब्यात घेण्याबाबत)

Unregistered

**विषय क्रं. ११६४**

वॉर्ड क्रं. ४९ मध्ये विविध भागात डांबरीकरण करणेसाठी र.रू. २० लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करण्याबाबत मा.लक्ष्मण आरडे व मा.आबा बागुल, विरोधी पक्षनेता यांचे दि. २८/७/२००९ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्र. ४५० दि. ४/८/२००९ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र. मआ/विका २/६२५ दि. ५/१२/२००९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ११६५**

नगरसचिव कार्यालयाकडील मोटार सारथी सेवकांना निवडणूक काळात जादा कामाचे वेतन र.रुपये २,५८,१३९=४३ आदा करणेस व सदरची रक्कम आर ई २१-सी, १०३-ए, ११- यांत्रिक, ग-मोटार विभाग, ३-कायम सेवक वेतन या अर्थशिर्षकावर खर्ची करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/व्हेडेपो/६२६ दि. ५/१२/२००९ चे पत्र.

**विषय क्रं. ११६६**

वॉर्ड क्र. ६५ (आयडीयल कॉलनी) मध्ये विविध ठिकाणी इंटरलॉकींग करणेसाठी र.रुपये २० लाखाचे वर्गीकरण करण्याबाबत मा.मुरलीधर मोहोळ व मा.सौ.अश्विनी कदम यांचे दि. २७/७/२००९ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्र. ४४६ दि. २८/७/२००९ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र. मआ/विका क्र.१/६३१ दि. ७/१२/२००९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ११६७**

वॉर्ड क्रं. १० मध्ये विविध ठिकाणी इंटरलॉकींग ब्लॉक बसविणे या कामासाठी र.रुपये ९ लाखाचे वर्गीकरण करण्याबाबत मा.सौ.उषा कळमकर यांचे दि. १६/९/२००९ चे पत्रावर झालेला स्थायी समिती ठराव क्र. ८२८ दि. २२/९/२००९ ला अनुसरुन मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी क्र. मआ/विका क्र.२/६३४ दि. ७/१२/२००९ ने पाठविलेला अभिप्राय विचारासाठी.

**विषय क्रं. ११६८**

शरद संगणक योजना-पुणे मनपा व स्वयंसेवी संस्थेचा संयुक्त प्रकल्प राबविणेसाठी खालील नमूद संस्थांच्या माध्यमातून ही योजना राबविणेस व त्यासाठी त्यांच्याशी सामंजस्य करारनामा करुन प्रायोगिक तत्वावर ११ महिन्याच्या कालावधीसाठी संगणक युक्त बस चालविण्यास देण्यास व कायदेशिर प्रश्न निर्माण झालेला विरोधी पक्षनेता या पदाबाबत कायदेशिर मत मिळताच अलाहिदा त्यांच्या वॉर्डात ही योजना राबविण्यास मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नावियो/६३५ दि. ८/१२/२००९ चे पत्र.

१) कै.शिवाजीराव भोसले प्रतिष्ठान
२) कल्पवृक्ष महिला उन्नती संस्था
३) प्रबोधन विचारधारा संस्था
४) दिशा फौंडेशन – महिला विकास संस्था

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

Unregistered